दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | सोमवार दि.४ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २४४ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Monday 4 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 244 | Pages 4 | Rate 4 Rs

## मुंबई–सातारा महामार्गावर कारला भीषण आग

**मुंबई**–पुण्यातील सातारा–मुंबई महामार्गावर स्वामीनारायण मंदिराजवळ एका चारचाकी वाहनाला (क्रमांक MH 43-CG-4068) भीषण आग लागल्याची दुर्घटना घडली. या आगीत संबंधित वाहन पूर्णपणे जळून खाक झाले असले तरी, वाहनातील सर्व प्रवासी वेळीच बाहेर पडल्याने सुदैवाने कोणताही अनर्थ घडला नाही. दरम्यान, या घटनेमुळे महामार्गावर काही काळ विस्कळीत झालेली वाहतूक सुरळीत करण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, पुणे–सातारा महामार्गावर आज सायंकाळच्या ७.४५ च्या सुमारास पाचगणीहून पुण्याच्या दिशेने येणाऱ्या एका वॅगनआर कारला (क्रमांक MH 43 CG 4068) भीषण आग लागली. आनंद नगर, सिंहगड रोड येथील रहिवासी शिवाजी सोपान तोडकर (५२) आणि त्यांचे दोन मित्र या गाडीतून प्रवास करत असताना स्वामीनारायण मंदिराजवळ हा अपघात घडला. गाडीच्या इंजिनने अचानक पेट घेतल्याचे लक्षात येताच तोडकर आणि त्यांच्या मित्रांनी तत्काळ खाली उडी मारल्याने सुदैवाने तिघेही सुखरूप बचावले.

# जातीची गोष्ट केली, तर जोरात लाथ घालेन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे विधान

## देशात कुणाशीही कोणताही भेदभाव होत नसल्याचा दावा

### भारताची प्रगती यंत्रामुळे नव्हे, तर कामगारांमुळे

**केंद्रीय मंत्र्यांनी यावेळी असेही नमूद केले की, ते आपले विचार नेहमीच मनमोकळेपणाने मांडतात आणि आपल्या तत्त्वांवर ठाम राहतात. नितीन गडकरी म्हणाले, मी जे काही बोलतो, ते पूर्ण आत्मविश्वासाने आणि धैर्याने बोलतो. मी माझ्या शब्दाला जागलो आहे की नाही, यावर कुणीही कधीही प्रश्न उपस्थित करू शकत नाही. आपल्या भाषणात त्यांनी राष्ट्रनिर्मिती मागील सर्वात मोठी शक्ती म्हणून कामगारांच्या योगदानावर प्रकाश टाकला. तसेच भारताची प्रगती केवळ यंत्रांमुळे नव्हे, तर लक्षावधी कामगारांच्या कठोर परिश्रमामुळे आणि समर्पणामुळे शक्य झाली, असे ठामपणे सांगितले.**

**नागपूर । प्रतिनिधी**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जातीपातीचे राजकारण करणाऱ्यांवर अत्यंत आक्रमक शब्दांत हल्ला चढवला आहे. देशात हिंदू व मुस्लिमांना एकाच भावात गॅस, पेट्रोल व डिझेल मिळते. त्यामुळे देशात विकास व सोयी सुविधांच्या बाबतीत कुणाशीही भेदभाव होत नाही. या प्रकरणी कुणी माझ्याकडे जातीचा विषय काढला, तर मी त्याला लाथ घालेन, असे त्यांनी म्हटले आहे.

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी शुक्रवारी नागपूर येथे आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त आयोजित एका कार्यक्रमाला हजेरी लावली. यावेळी आपल्या मिश्किल भाषणाद्वारे त्यांनी जात आणि धर्माच्या आधारावर राजकारण करणाऱ्या नेत्यांवर तिखट शब्दांत निशाणा साधला. नितीन गडकरी म्हणाले, आजकाल अनेक लोक जात आणि धर्माच्या नावावर समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करतात. परंतु अशा प्रकारच्या राजकारणावर माझा विश्वास नाही. जात आधारित राजकारणामुळे राष्ट्राचे कल्याण होऊ शकत नाही.

नितीन गडकरी म्हणाले, या राष्ट्राची उभारणी लक्षावधी कामगारांच्या रक्त आणि घामावर झाली आहे. देशाच्या विकासात आपल्या कामगारांनी अफाट योगदान दिले आहे. मग ते रस्ते असोत, इमारती असोत, सिंचन प्रकल्प असोत किंवा मोठ्या पायाभूत सुविधांचे उपक्रम असोत. या सर्वांची निर्मिती केवळ यंत्रांद्वारे नव्हे, तर कामगारांच्या कष्टांतूनच झाली आहे. हा कामगार वर्गच देशाच्या विकासाचा खरा कणा आहे आणि तो यथोचित मान - सन्मान व संधी मिळण्यास पात्र आहे. या कामगारांचा राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि त्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील याची खात्री करण्यासाठी सरकार अविरत प्रयत्नशील आहे.



### जातीच्या गोष्टी करणाऱ्यांना लाथ घालणार

**आपल्या नेहमीच्याच स्पष्ट आणि मिश्किल शैलीत नितीन गडकरी म्हणाले, एखाद्या हिंदूला ज्या दरात गॅस, पेट्रोल आणि डिझेल मिळते, अगदी त्याच दरात ते एखाद्या मुस्लिमालाही मिळते. यावरून हे स्पष्ट होते की, विकास आणि सार्वजनिक सोयी सुविधांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा भेदभाव अजिबात केला जात नाही. जातीचा पाढा वाचत बसण्यात काहीच अर्थ नाही. मी असे अनेक नेते पाहिले आहेत, जे सार्वजनिक व्यासपीठांवरून जातीबद्दल बोलतात आणि घोषणा देतात. पण जेव्हा ते खाजगीत भेटतात, तेव्हा मात्र ते आपल्या मुलांसाठी किंवा पत्नीसाठी निवडणुकीचे तिकीट मागत असतात. जनतेने या दांभिक नेत्यांचा खरा चेहरा आता ओळखला आहे. जो कुणी जातीबद्दल बोलेल, त्याला मी एक जोरात लाथ घालेन.**

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन आई, वडील व भावाला जीवे मारण्याची धमकी, आरोपीला तीन दिवसाची पोलीस कोठडी

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज येथील अल्पवयीन मुलीचा दि.१४ एप्रिल रोजी पाठलाग करून तीला कळंब रोड परिसरातील आपल्या घरी घेवून जाऊन दुपारी १ ते ३ च्या दरम्यान तीची छेडछाड करून व बळजबरीने तीचे कपडे काढून तिच्यावर अत्याचार केला.कोणाला सांगितलेस तर तुझ्या आई,वडील,व भावाला जीवे मारण्याची धमकी दिल्यामुळे मुलीने हा प्रकार कोणालाही सांगितला नव्हता.परंतु दोन दिवसापूर्वी घडलेल्या प्रकारांची माहिती मुलीने आपल्या आईला दिली आणि पिडीत मुलीच्या फिर्यादी वरून रेहान रियाज शेख रा.कळंब रोड,केज याचे विरुद्ध केज पोलिसात गून्हा नोंद झाला आहे.

केज येथील १५ वर्षे १० महिने २८ दिवस वय असलेल्या अल्पवयीन मुलीचा दि.१४ एप्रिल २०२६ रोजी पाठलाग करून तीला कळंब रोड परिसरातील आपल्या घरी घेवून जाऊन दुपारी १ ते ३ वाजण्याच्या दरम्यान तीची छेडछाड करून,बळजबरीने तीचे कपडे काढून बळजबरीने तिच्याशी शारीरिक संबंध केले.या घटनेबद्दल कोणाला कांही सांगितलेस तर तुझ्या आई,वडील व भावाला जीवे मारण्याची धमकी दिली.पिडीत मुलीला व्हीडिओ कॉल करून त्याचा स्क्रिनशॉट काढून तीच्या मोबाईल वर पाठविला.त्याच्या पेन ड्राईव्ह मध्ये बळजबरीने अत्याचार केलेला व्हीडिओ तीला दाखविला.व यापुढे तु आता मी सांगेल तसेच वागायचे असे म्हणुन कपडे काढायला सांगितले असता मुलीने विरोध केला असता तुझे व्हीडिओ समाज माध्यमावर व्हायरल करण्याची धमकी दिली. हा प्रकार पिडीत मुलीने आपल्या आईला सांगितल्यानंतर १५ वर्षे १० महिने २८ दिवस वय असलेल्या अल्पवयीन मुलीच्या फिर्यादीवरून रेहान रियाज शेख रा. कळंब रोड,केज याच्या विरुद्ध शनिवारी उशिरा गून्हा नोंद झाला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंक पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके हे पुढील तपास करीत आहेत.




### आरोपीला पोलीस कोठडी

**या प्रकरणातील आरोपी रेहान रियाज शेख याला पिंक पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके यांनी जेरबंद केले असून, आरोपीला रविवारी केज न्यायालयात हजर केले आसता केज न्यायालयाने आरोपीला तीन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.**

# केकतसारणी येथे ७ मे रोजी राष्ट्रचिंतन अभियान अंतर्गत चर्चासत्राचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील केकतसारणी येथे हिंदराष्ट्र ऑर्गनायझेशन संस्थेच्या वतीने 'राष्ट्र चिंतन अभियान'अंतर्गत येत्या गुरुवारी,७ मे २०२६रोजी विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमात कृषी,आरोग्य आणि शिक्षण या तीन महत्त्वाच्या विषयांवर सखोल मार्गदर्शन आणि चर्चा होणार आहे.



**कार्यक्रमाची रूपरेषा**

हे चर्चासत्र केकतसारणी येथील मारुती मंदिर सभागृहात सकाळी ९ ते ११ या वेळेत संपन्न होईल.या सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून महर्षी गज अरविंदजी उपस्थित राहणार असून, त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ परिसरातील नागरिकांना घेता येणार आहे.

**तज्ज्ञांचे मार्गदर्शन व प्रश्नोत्तर सत्र**

या चर्चासत्रात कृषी, आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रातील विविध मान्यवर आपली मते मांडणार आहेत.केवळ मार्गदर्शनच नव्हे,तर नागरिकांच्या मनातील शंका दूर करण्यासाठी विशेष प्रश्नोत्तर सत्राचे आयोजनही करण्यात आले आहे.यामध्ये उपस्थित नागरिक आपले प्रश्न मांडू शकतील आणि मान्यवर त्यांचे निरसन करतील.राष्ट्र उभारणीत कृषी,आरोग्य आणि शिक्षण हे तीन आधारस्तंभ आहेत.या विषयांवर जनजागृती व्हावी आणि नागरिकांच्या समस्यांना व्यासपीठ मिळावे,या उद्देशाने या चर्चासत्राचे आयोजन केले आहे, अशी माहिती हिंदराष्ट्र संघाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षा सौ.राधाताई सपकाळ यांनी दिली.या महत्त्वपूर्ण चर्चासत्राला केकतसारणी व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# निस्वार्थ सेवा आणि सामाजिक बांधिलकीमुळेच 'तुलसी' ला यश मिळाले; पुज्य भदंत डॉ.उपगुप्त महाथेरो यांचे प्रतिपादन

## तुलसी फॅशन कॉलेजच्या नूतन वास्तू व 'तुलसी क्रिएशन' शोरूमचे दिमाखात उद्घाटन संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

प्रा.प्रदीप रोडे यांनी निस्वार्थ सेवाभाव, नैतिकता, शील आणि सदाचार या मूल्यांच्या आधारावर उभारलेले तुलसी शैक्षणिक संकुल आज सामाजिक परिवर्तनाचे प्रेरणास्थान ठरले आहे. केवळ पैशाने नव्हे, तर समाजासाठी वेळ, बुद्धी आणि संपत्ती खर्च केल्यानेच खरे यश प्राप्त होते. प्रा.प्रदीप रोडे यांनी आपल्या कार्यातून हाच आदर्श समाजासमोर उभा केला आहे, असे प्रतिपादन पुज्य भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी केले.

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनच्या नूतन इमारतीचे तसेच 'तुलसी क्रिएशन – द कम्प्लीट वुमन्स ड्रीम वर्ल्ड' या शोरूमचे उद्घाटन रविवारी (दि. ३ मे) मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी ते मुख्य उद्घाटक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाचा प्रारंभ पूज्यनीय भिक्खू संघाच्या मंगल मैत्रीत आणि बुद्धवंदनेने झाला. यावेळी पुज्य भदंत करुणानंद महाथेरो आणि पुज्य भदंत धम्मशील थेरो यांनी मंगल आशीर्वाद दिले. या ऐतिहासिक सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून मा.रवींद्र जोगदंड, मा.दीपक कदम, मा.डॉ. सिद्धार्थ जोंधळे, मा.सुरेश लोंढे, मा.सुदिन गायकवाड, मा.सुधाकर बनटे, मा.संदीप उपरे, मा.पी.टी .मुने, मा.रविंद्र कोलप, मा.दीपा रोडे तसेच प्राचार्या डॉ.अश्विनी बेंद्रे यांच्यासह अनेक प्रशासकीय अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.यावेळी बोलताना पुज्य भदंत करुणानंद महाथेरो म्हणाले की, प्रा.प्रदीप रोडे यांच्या हातून आदर्श शैक्षणिक कार्य घडत आहे. त्यांच्या नावातच 'प्रदीप' म्हणजे प्रकाश आहे. भगवान बुद्धांच्या 'अत्तदीपो भव' या संदेशाप्रमाणे त्यांनी स्वतः प्रकाशमान होत असंख्यांच्या जीवनात ज्ञानदीप प्रज्वलित केला आहे.




त्यांचा सात्विक स्वभाव आणि समाजाभिमुख कार्य प्रेरणादायी आहे, असे म्हणाले.

तर, पुज्य भदंत धम्मशील थेरो यांनी प्रा. प्रदीप रोडे यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचे कौतुक केले. शून्यातून सुरू झालेला त्यांचा प्रवास कष्ट, परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर यशाच्या शिखरापर्यंत पोहोचला आहे. प्रचंड गरिबीत शिक्षण घेत त्यांनी शिकणाऱ्यापासून शिकवणाऱ्यापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास घडविला, असे सांगितले.

यावेळी उपस्थित मान्यवर मा.रवींद्र जोगदंड, मा.अशोक शिरसे, मा.सुरेश लोंढे आणि मा.दीपक कदम यांनीही शुभेच्छापर मनोगत व्यक्त करत तुलसी शैक्षणिक संकुलाच्या उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी संस्थेच्या गौरवशाली वाटचालीचा आढावा घेत विविध शैक्षणिक, कौशल्यविकास आणि सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांकडे स्किल आणि विल असेल, तर तो जगाच्या पाठीवर कुठेही स्वाभिमानाने, अभिमानाने आणि आर्थिकदृष्ट्या सक्षमपणे उभा राहू शकतो. विशेषतः मुलींना सशक्त, स्वावलंबी आणि उद्योजक बनविणे हेच आमचे ध्येय आहे, असे ते म्हणाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अंकुश कोरडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रो.डॉ. मनोहर शिरसाट यांनी केले, तर आभार प्रा विद्या अवघडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समूहातील सर्व प्राचार्य, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थिनींनी विशेष परिश्रम घेतले. या भव्य सोहळ्यास बीड जिल्ह्यासह परिसरातील नागरिक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## पुलांच्या बांधकामात तंत्रज्ञानाचा समन्वय

मुंबईचा एल्फिन्स्टन पूल हा केवळ लोखंड आणि दगडांचा ढाचा नव्हता, तर शहराच्या प्रगतीचा साक्षीदार होता. नव्या पुलामुळे मुंबईच्या वाहतुकीला नवी दिशा मिळेल; पण त्याच वेळी जुन्या पुलाचा इतिहास जपणे ही सामूहिक जबाबदारी आहे.स्वातंत्र्योत्तर काळातील पुलांची बांधकामे फार तर तीस–चाळीस वर्षे टिकतात; परंतु रेल्वेचे पूल, अनेक ठिकाणचे नद्यांवरचे पूल शंभर–सव्वाशे वर्षे सेवा देत राहिले. अलीकडचे पूल उद्घाटनापूर्वीच पडतात, धोकादायक ठरतात, हे पाहता कामात प्रामाणिकपणा, बांधकामात नव्या–जुन्याची सांगड घातली असता पूल जादा काळ टिकतील आणि सरकारचा, पर्यायाने जनतेचाही पैसा वाचेल.मुंबईसारख्या गतिमान शहरात विकास आणि इतिहास यांचा संघर्ष नेहमीच दिसून येतो. एल्फिन्स्टन रोड ओव्हरब्रीजचे (प्रभादेवी पूल) अलीकडील विसर्जन हा त्याचाच एक जिवंत पुरावा आहे. ब्रिटिशकालीन अभियांत्रिकीचा उत्कृष्ट नमुना असलेला हा पूल केवळ एक वाहतूक मार्ग नव्हता, तर मुंबईच्या औद्योगिक आणि नागरी विकासाचा साक्षीदार होता. १९१३ मध्ये बांधण्यात आलेला एल्फिन्स्टन पूल त्या काळातील प्रगत अभियांत्रिकीचा उत्तम नमुना होता. स्टीलचे मजबूत गर्डर्स, आर्च–आधारित रचना आणि अचूक मोजमाप यामुळे हा पूल अत्यंत भक्कम बनवण्यात आला होता. त्या काळात वाढत्या रेल्वे वाहतुकीमुळे लेव्हल क्रॉसिंग धोकादायक ठरत असल्यामुळे अशा ओव्हरब्रीजची गरज निर्माण झाली. विशेष म्हणजे या पुलाची उभारणी करताना दीर्घकालीन वापर आणि सुरक्षिततेचा विचार केला होता. यावरून ब्रिटिशकालीन नियोजनाची दूरदृष्टी स्पष्ट होते.एल्फिन्स्टन उड्डाणपुलाने तब्बल शंभर वर्षांहून अधिक काळ मुंबईकरांची सेवा केली. परळ आणि प्रभादेवी या महत्त्वाच्या भागांना जोडणारा हा पूल गिरणगावातील कामगार, व्यापारी आणि प्रवासी यांच्यासाठी जीवनवाहिनी ठरला होता. इतक्या दीर्घ काळ टिकून राहणे हे त्याच्या दर्जेदार बांधकामाचे आणि नियमित देखभालीचे द्योतक आहे. या पुलाप्रमाणे नगर रेल्वे स्टेशनकडे जाणारा सीनेवरचा लोखंडी पूल, कल्याणमधील दुर्गाडी किल्ल्याजवळचा पूल यांनी शंभर वर्षांहून अधिक काळ सेवा दिली. रेल्वेचे पूल तर दीडशे वर्षे सेवा देत आहेत. आजकाल तर उद्घाटन होण्याअगोदरच पूल कोसळतात. पणजीनजीकचा मांडवी नदीवरचा पूल असो, की बिहारमधील पूल; कामाच्या गुणवत्तेचा आरसा त्यांनी दाखवला. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या तुलनेत जुनी साधने वापरूनही इतका टिकाऊ पूल उभारणे ही त्या काळातील अभियंत्यांची मोठी कामगिरी म्हणावी लागेल.बदलत्या काळानुसार मुंबईतील वाहतुकीच्या गरजा झपाट्याने वाढल्या. वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि उपनगरी रेल्वेवरील ताण यामुळे जुना पूल अपुरा ठरू लागला. याच पार्श्वभूमीवर नवीन दुमजली उड्डाणपूल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. नागपूरमध्ये तर तीन मजली पूल आहेत. स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये सुधारणा झाल्या असल्या, तरी तंत्रज्ञानात जुन्या–नव्याची सांगड घातल्यास टिकावूपणा वाढू शकतो. आता एल्फिन्स्टन पुलाच्या जागी तयार होणारा नवीन पूल वरळी–शिवडी उड्डाणपूल प्रकल्पाचा भाग आहे. तो अधिक क्षमतेचा आणि आधुनिक सुविधांनी युक्त असेल. यामुळे पूर्व–पश्चिम जोडणी अधिक सुलभ होईल आणि वाहतूक वेगवान होईल. जुना पूल हटवल्यामुळे कुर्ला ते परळ दरम्यान दोन अतिरिक्त उपनगरी रेल्वे मार्गांसाठी जागा उपलब्ध झाली आहे. यामुळे रेल्वेची क्षमता वाढेल, गर्दी कमी होईल आणि प्रवाशांचा वेळ वाचेल. तसेच नवीन उड्डाणपुलामुळे रस्ते वाहतुकीवरील ताणही कमी होईल. वाहतूक कोंडी कमी होऊन शहरातील हालचाल अधिक सुसूत्र आणि जलद होण्यास मदत होईल. एल्फिन्स्टन पूल पाडणे म्हणजे एका युगाचा अंत आहे; मात्र या प्रक्रियेत त्यावरील ऐतिहासिक शिलालेख जतन करून नव्या पुलात समाविष्ट करण्याचा निर्णय सकारात्मक आहे. विकासाच्या नावाखाली इतिहास पुसून टाकणे योग्य नाही; उलट तो जपून पुढे जाणे आवश्यक आहे. एल्फिन्स्टन रोड उड्डाणपुलाचे शेवटचे गर्डर पाडण्यात आले, तेव्हा एक युग इतिहासजमा झाले. तब्बल ११३ वर्षे परळ आणि प्रभादेवी दरम्यान प्रवाशांच्या हालचाली सुलभ करणारा हा पूल इतिहासजमा झाला. हा बदल केवळ एक पायाभूत सुविधा बदल नाही, तर शहराच्या बदलत्या गरजांचे प्रतीक आहे. मध्य रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कुर्ला या अत्यंत व्यस्त मार्गावर पाच ब्रिटिशकालीन पूल हटवण्याचे काम पूर्ण केले आहे. हे काम मुंबईच्या उपनगरी रेल्वे सेवांचा विस्तार आणि आधुनिकीकरण करण्यासाठी अत्यावश्यक मानले जात आहे. विशेष म्हणजे, एल्फिन्स्टन पूल हटवताना रेल्वे वाहतुकीत कमीत कमी अडथळा निर्माण होईल, याची पूर्ण काळजी घेण्यात आली. रात्रीच्या विशेष ब्लॉकमध्ये हे काम पूर्ण करून सकाळी सेवा सुरळीत सुरू करण्यात आली. पूल हटवल्यामुळे कुर्ला ते परळ दरम्यान दोन अतिरिक्त उपनगरी रेल्वे मार्गांसाठी जागा उपलब्ध झाली. ते पुढे सीएसएमटीपर्यंत वाढवले जाणार आहेत.तांत्रिक दृष्टिकोनातून पाहता १९१३ मध्ये बांधलेला हा पूल त्या काळातील अभियांत्रिकी कौशल्याचे उत्कृष्ट उदाहरण होता. स्टील गर्डर, क्रॉस सपोर्ट आणि आर्च सिस्टीम यांचा वापर करून तयार करण्यात आलेली ही रचना आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या तुलनेत जुनी वाटली, तरी तिचे योगदान अमूल्य होते. या पुलाच्या पाडकामासाठी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्यात आले. जवळपास वीस वेळा रेल्वे ब्लॉक्स घेऊन डेक स्लॅब, पाइपलाइन, केबल्स आणि इतर संरचना हटवण्यात आल्या. अंतिम टप्प्यात ८०० टन क्षमतेच्या क्रेनच्या साहाय्याने मुख्य गर्डर्स काढण्यात आले. यासाठी विविध विभागांमधील अधिकाऱ्यांचे समन्वय आणि ९५ कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले.हा संपूर्ण उपक्रम एक गोष्ट स्पष्ट करतो, की शहराचा विकास ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. जुन्या आणि कालबाह्य झालेल्या संरचना बदलणे आवश्यक असते. त्यामुळे सुरक्षितता आणि कार्यक्षमता वाढेल; मात्र या प्रक्रियेत इतिहास आणि वारसा जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे. एल्फिन्स्टन पूल आज राहिला नाही; पण त्याने घडवलेला इतिहास कायम स्मरणात राहील. मुंबईसारख्या गतिमान शहरासाठी हा बदल अपरिहार्य आहे. विकासाच्या या नव्या टप्प्यात आधुनिक सुविधा आणि ऐतिहासिक जाण यांचा समतोल राखणे हीच खरी कसोटी आहे.

# प्रसिद्धीचा काळ सरल्यावर दुर्लक्षित झालेल्या अभिनय क्षेत्रातील जेष्ठ कलाकारांना दैनंदिन आयुष्यात भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी सिने आर्टिस्ट वेलफेअर ट्रस्ट (CAWT) ने सुरु केलेले काम अतिशय कौतुकास्पद–रविंद्र चव्हाण

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

अभिनय क्षेत्रातील दिग्गज कलाकारांना आपण सिनेमाच्या रुपेरी पडद्यावर पाहतो. या क्षेत्रात मिळणारा पैसा व माया यांची चर्चा आपण ऐकतो. पण प्रसिद्धीच्या पडद्याबाहेर गेल्यावर त्या कलाकारांच्या आयुष्यामध्ये किती दुःख असते ते आपल्याला कधीही दिसत नाही. अशा या जेष्ठ कलाकारांसाठी दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर, आशा पारेख यांसारख्या कलाकारांनी एकत्र येऊन जेष्ठ कलाकारांचे दुःख, त्यांच्या गरजा, त्यांचे आजारपण यांसारख्या समस्या सोडवण्यासाठी CAWT सारखा एक मंच तयार केला असून या संस्थेतर्फे केले जाणारे काम अतिशय कौतुकास्पद आहे, असे वक्तव्य भाजपचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आज मुंबईत केले.सिने आर्टिस्ट वेलफेअर ट्रस्ट CAWT आणि सिने अँड टीव्ही आर्टिस्ट असोसिएशनच्या वतीने उ–थढ च्या स्थापनेत आणि




CINTAA - CAWT टॉवरच्या उभारणीत ज्या विश्वस्थ कलाकारांनी आपले अमूल्य योगदान दिले, त्यामध्ये प्रामुख्याने सुप्रसिद्ध अभिनेते दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर, आशा पारेख, अमरीश पुरी, अमजद खान, चंद्रशेखर वैद्य, दारासिंह या कलाकारांचा सन्मान करण्यासाठी त्या कलाकारांचे फोटो आणि माहिती देणाऱ्या फलकाचे उदघाटन आज भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळेस ते बोलत होते.

रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले की, अभिनय क्षेत्रातील प्रत्येक कलाकाराचा एक प्रसिद्धीचा काळ असतो. तो चांगला काळ ओसरला कि सरत्या काळात त्या कलाकारांकडे कुणी पाहत नाही. त्यांची कुणी चौकशी करत नाहीत. असे जवळपास ९ ते १० हजार कलाकार सध्या अभिनय क्षेत्रात आहेत. अशा कलाकारांचे दैनंदिन जीवन अतिशय हलाखीचे असते. यामध्ये अभिनय क्षेत्रात काम करणारे इतर कामगार यांची संख्या देखील मोठी आहे. याना सामाजिक जीवनात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, अशी माहिती मला CAWT च्या अध्यक्षा प्रीती सप्रू यांनी मला आज दिली. या सर्व समस्यांचे निराकरण करण्याबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्याशी चर्चा करून लवकरात लवकर सोडवण्याचा प्रयत्न करणार आहे. तसेच CAWT ला जेष्ठ कलाकारांकरिता मी कोकणातील केसरी, सावंतवाडी येथील माझी स्वतःची एक एकर जागा देण्यास तयार आहे, असे रविंद्र चव्हाण म्हणाले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी रविंद्र चव्हाण यांच्या सोबत जेष्ठ अभिनेत्री व CAWT च्या अध्यक्षा प्रीती सप्रू, ट्रस्टच्या सचिव अभिनेत्री संभावना सेठ, संस्थेचे खजिनदार अभिनेते दीपक पराशर, बॉलिवूड अभिनेते राजपाल यादव, मनोज जोशी, मुकेश ऋषी, आयुब खान, अभिनेत्री कुनिका आणि सिने व टीव्ही क्षेत्रातील अनेक कलाकार उपस्थित होते.

# लाकडावर उभे मृत्यूचं शेड कल्याण पंचायत समिती परिसरात जीवितास धोका

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

कल्याण येथील पंचायत समिती कार्यालयाच्या इमारतीबाहेर उभारण्यात आलेले शेड अत्यंत धोकादायक अवस्थेत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. हे शेड अक्षरशः पडक्या लाकडाच्या आधारावर उभे असून कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. स्थानिक पत्रकार व दक्ष नागरिक विशाल कुरकुटे यांनी याबाबत जिल्हा परिषद प्रशासनाकडे लेखी निवेदन देत तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. संबंधित शेडच्या परिसरातून दररोज नागरिक, कर्मचारी, दिव्यांग व्यक्ती, लहान मुले तसेच गर्भवती महिला ये–जा करत असल्यामुळे मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त होत आहे. या संदर्भात यापूर्वीही प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले असतानाही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रशासनाच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. याबाबत तातडीने शेड दुरुस्त करणे किंवा पूर्णपणे हटवण्याची मागणी करण्यात



आली आहे. अन्यथा येत्या काही दिवसांत नागरिकांच्या सुरक्षेसाठी आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही देण्यात आला आहे. आता या गंभीर बाबीकडे प्रशासन कितपत गांभीर्याने लक्ष देणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# उरण नगरपरिषदेच्या कंत्राटी सफाई कामगारांसाठी आरोग्य तपासणी शिबीर संपन्न



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

कामगार दिन व महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून उरण नगरपरिषदेच्या कंत्राटी सफाई कामगारांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने मोफत रक्त, बीपी, शुगर, ईसीजी तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिराचे उद्घाटन उरण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा भावनाताई घाणेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. नितीन तिवारी, कामगार नेते संतोष पवार, स्वप्नलता पाबळेकर, माजी उपनगराध्यक्षा तथा नगरसेविका नाहीदा ठाकूर, नगरसेविका प्रमिला पवार, नगरसेविका प्रार्थना म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.जनतेचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी स्वतःचे आरोग्य धोक्यात टाकणाऱ्या सफाई कामगारांची आरोग्य तपासणी होणे गरजेचे आहे, या भावनेतून श्री पॅथॉलॉजी लॅबोरेटरी, उरण नगरपरिषद आणि म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर घेण्यात आले.

मे सुश्रुषा हार्ट केअर सेंटर, पनवेल व नेक्स व्हिजन आय हॉस्पिटल, द्रोणागिरी–उरण यांच्या सहकार्याने या शिबिरात हृदय विकार तपासणी, ई.सी.जी., डोळे तपासणी, शुगर तपासणी, बी.पी. तपासणी तसेच लिपिड प्रोफाइल, LFT, KFT, CBC, Hba1c सह संपूर्ण रक्त तपासणी मोफत करण्यात आली.श्री पॅथॉलॉजी लॅबोरेटरीच्या ३० व्या वर्धापन दिनानिमित्त हे विशेष शिबीर दि. ०१ मे २०२६ रोजी सकाळी १०:००ते दुपारी २:०० या वेळेत उरण नगरपरिषद कार्यालय येथे घेण्यात आले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी श्री पॅथॉलॉजीचा स्टाफ तसेच म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे पदाधिकारी मधुकर भोईर, कोषाध्यक्ष माधव सिद्धेश्वरे यांनी विशेष मेहनत घेतली. भावनाताई घाणेकर नगराध्यक्षा ,संतोष पवार कार्याध्यक्ष, म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियन, डॉ. नितीन तिवारी, डॉ. नयना पाटील–ठाकूर j आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# डबलडेकर बसमुळे ठाणेकरांचा प्रवास अधिक सुखकर होणार–उपमुख्यमंत्री

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेत वातानुकुलित डबलडेकर इलेक्ट्रिक बस दाखल झाली असून या बसचा शुभारंभ आज राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. या डबलडेकर बसमुळे ठाणेकरांचा प्रवास अधिक सुखकर, आरामदायी होणार असून ही बस आपली स्वत:ची आहे असे समजून तिची काळजी घ्यावी असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी नमूद केलेयावेळी महापौर शर्मिला पिंपळोलकर, महापालिका सौरभ राव, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, विरोधी पक्ष नेते अशरफ ऊ शानू पठाण, स्थानिक नगरसेवक



राजेश मोरे, नगरसेविका काजल गुणीजन, अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त जी. जी. गोदेपुरे, मधूकर बोडके, डॉ. मिताली संचेती, दिपक झिंजाड, जितेंद्र निकम, टीएमटीचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महापालिका भवन येथून लुईसवाडी ते पुन्हा महापालिका भवन असा प्रवास डबलडेकर बसमधून केला.

जी.सी.सी तत्वावर या बसेस ठाणे परिवहनमध्ये दाखल होणार असून त्याचा कोणताही भार परिवहन सेवेवर पडणार नाही. या डबलडेकर बसमध्ये एकाचवेळी ६५ प्रवासी आसनस्थ होवून प्रवास करु शकणार आहे, तर ३३ प्रवासी उभे राहून प्रवास करु शकतील.

सद्यस्थितीत ही बस तीन हात नाका ते गायमुख या मार्गावर धावणार आहे. इलेक्ट्रिक बस असल्यामुळे ठाणेकरांचा प्रवास पर्यावरणपूरक असा होणार असून ठाणेकरांना या बसमधून पर्यटनाचा आनंद लुटता येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. परिवहन ताफ्यात आणखी ९ बसेस लवकरच दाखल होणार असल्याचेही परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहरे यांनी नमूद केले.

# मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावरील सोनवी चौकात अभूतपूर्व वाहतूक कोंडी

## संगमेश्वरात वाहनचालक आणि ग्रामस्थ संतप्त;रुग्णवाहिका अडकली;वाहतूक पोलिसांची कमतरता

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग वरील संगमेश्वर बाजारपेठ परिसरात सुरू असलेले चौपदरीकरणाचे काम मोठ्या प्रमाणात रखडल्याने स्थानिक ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. संगमेश्वर येथील सोनवी पुलाची एक मार्गीका ३१ मार्चपूर्वी सुरू करण्याचे दिलेले आश्वासन फोल ठरल्याने गेले काही दिवस संगमेश्वर सोनवी चौक येथे अभूतपूर्व वाहतूक कोंडी होत आहे. आज १ मे पासून सलग तीन दिवस सुट्ट्या आल्याने या मार्गावर वाहनांची संख्या वाढवून कमालीची वाहतूक कोंडी होत असल्याचे पाहायला मिळाले. वाहतूक शाखेच्या पोलिसांचा अभाव असल्याने वाहन चालक होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे त्रस्त आणि संतप्त झाल्याचे पाहायला मिळाले.

आज सकाळी सहा वाजल्यापासूनच संगमेश्वर सोनी चौकात वाहतूक कोंडीला सुरुवात झाली. वाहनांच्या सुमारे दोन ते तीन किलोमीटर रांगा लागल्याचे पाहायला मिळत होते. मुंबई कडून येणाऱ्या वाहन चालकाने गुगल मॅप वर पर्यायी रस्ता शोधून आपली वाहने संगमेश्वर बाजारपेठ मार्गे आणल्याने संगमेश्वर बाजारपेठेत देखील असंख्य वाहने एकाच वेळी आल्याने वाहतूक



यामुळे वाहन चालक कमालीचे त्रस्त झाले.

संगमेश्वर ते माभळे दरम्यान राष्ट्रीय महामार्गाच्या अपूर्ण असणाऱ्या कामांमुळे वाहनचालक आणि नागरिकांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. धामणी ते लांजा या भागात मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाची अनेक कामे पूर्ण होणे बाकी असताना टोल नाके सुरू करण्याबाबत मात्र मोठ्या हालचाली सुरू झाल्याने कामे अपूर्ण आणि टोल नाके सुरू अशी विसंगती भविष्यात पाहायला मिळणार असल्याने वाहन चालकांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे. संगमेश्वर येथील सोनवी पुलाजवळ वारंवार वाहतूक कोंडी होत तयार नसल्याचे दिसून येत आहे, तर जिथे आहेत तेही पूर्णपणे मातीचे असल्याने पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दोन दिवसांपूर्वीच संतप्त झालेल्या संगमेश्वर येथील स्थानिक ग्रामस्थ आणि वाहन चालकाने अचानक रास्ता रोको करून ठेकेदाराला वेगाने कामे पूर्ण न केल्यास पाच मे रोजी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

महामार्गावर ठिकठिकाणी मातीचे ढिगारे टाकलेले असून दिशादर्शक फलकांचा अभाव असल्याने वाहनचालकांची मोठी गैरसोय होत आहे. बांधकाम सुरू असतानाही आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत, अशी तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. चौपदरीकरणादरम्यान संरक्षण भिंत उभारणे अपेक्षित असताना त्या कामालाही सुरुवात झालेली नाही.आज सकाळी सहा वाजल्यापासून सुरू झालेल्या संगमेश्वर येथील वाहतूक कोंडीमुळे वाहने अत्यंत मंद गतीने पुढे सरकत होती. वाहतूक सुरळीत करण्यास वाहतूक शाखेचे पोलीस देखील उपस्थित नव्हते. संगमेश्वर पासून शास्त्री पूल पर्यंत मुंबईच्या दिशेने तर सोनवी चौक पासून ओझरखोल पर्यंत रत्नागिरीच्या दिशेने वाहनांच्या रांगा लागलेल्या पाहायला मिळाल्या. याच वाहनात शास्त्री पुल येथून सायरन वाजवत येणाऱ्या रुग्णवाहिकेला देखील मार्ग मोकळा मिळणे अशक्य झाले. संगमेश्वर ते शास्त्री पूल दरम्यान एक मार्ग ठप्प असताना मुंबईहून येणाऱ्या छोट्या वाहन चालकांनी दुसऱ्या बाजूने वाहने घातल्याने एकाच वेळी दोन्ही बाजू ठप्प झाल्याचे पाहायला मिळाले. असा आगाऊपणा करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करण्यास वाहतूक शाखेचे पोलीस उपलब्ध नसल्याने या गोंधळात आणखी भर पडला.

संगमेश्वर ते माभळे दरम्यान उंच खोदकाम करण्यात आल्याने गावकऱ्यांसमोर ये–जा करण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. भर उन्हात काम सुरू असताना धूळ नियंत्रणासाठी पाणीही पुरेसे टाकले जात नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

# खडक मांजरीत महाराष्ट्र दिनी शाश्वत शेतीचा संदेश भव्य सत्कार सोहळ्यात आधुनिक तंत्रज्ञानावर भर

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**





लोहा तालुक्यातील खडकमांजरी येथे १ मे रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या निमित्ताने खडक मांजरी येथे ग्रामपंचायत कार्यालय व जिल्हा परिषद शाळेच्या संयुक्त विद्यमाने समस्त ग्रामस्थांच्या उपस्थितीत भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला गावातील मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी, ग्रामसेवक, आशा सेविका, तसेच शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी युवा शेतकरी रत्नाकर पाटील ढगे यांनी मार्गदर्शन करताना बदलत्या हवामान परिस्थितीत शेती टिकवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन केले. कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांची निवड, बेड पद्धतीचा वापर तसेच कृषी विद्यापीठांनी विकसित केलेल्या सुधारित बियाण्यांचा उपयोग करण्यावर त्यांनी भर दिला.

मराठवाड्यातील अनियमित पावसाच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाचे महत्त्व अधोरेखित करत 'जलतारा' प्रकल्प लोकसहभागातून राबवण्याचे त्यांनी सुचवले. विहिरींचे पुनर्भरण, पाण्याचा योग्य साठा निर्माण करणे यासाठी श्रमदानाची गरज त्यांनी व्यक्त केली. शेतीसोबत दुग्ध व्यवसायासारख्या पूरक व्यवसायाकडे वळण्याचेही त्यांनी आवाहन केले.जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी हिरवळीचे खत, आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा, तसेच रासायनिक खतांचा वापर कमी करून सेंद्रिय उपायांचा वापर वाढवावा, असे त्यांनी सांगितले. दशपर्णी अर्क, निंब अर्क, ब्रह्मास्त्र यांसारख्या सेंद्रिय कीडनियंत्रण उपायांसोबत पक्षी थांबे व चिकट सापळ्यांचा वापर करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर वृक्षलागवड व संवर्धन आवश्यक असल्याचे सांगत, कमी पावसातही इस्राईलसारख्या देशांनी साधलेली शेतीतील प्रगती हे प्रेरणादायी उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले. योग्य नियोजन व सकारात्मक दृष्टिकोनातून स्थानिक पातळीवरही मोठी प्रगती साधता येऊ शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.याशिवाय, शेतीमालावर प्रक्रिया उद्योग उभारण्याची गरज अधोरेखित करत केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. सामूहिक विकासासाठी महिला बचत गट, शेतकरी गट तसेच शेतकरी उत्पादक कंपन्या (ऋझज) स्थापन करण्यावर विशेष भर देण्यात आला.या कार्यक्रमाचे आयोजन माजी सरपंच पांडुरंग चौगुले यांच्या संकल्पनेतून करण्यात आले होते. यावेळी रत्नाकर पाटील ढगे यांचा सत्कार गावचे सरपंच - चांदोबा श्रीपती कापसे व माजी सरपंच -पांडुरंग चौगुले, यांनी केला.यावेळी माधव पाटील कापसे, पोलिस पाटील गौतम वाघमारे,माजी सरपंच श्यामराव वाघमारे, चांदोबा एडके,केशव नरवाडे,पत्रकार राजकुमार पिलोळे, चंद्रकांत दरेगावे,यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमातून शाश्वत शेती, जलसंधारण, पर्यावरण संवर्धन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत गावकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण झाली असून, एकत्रित प्रयत्नांतून गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,बनसारोळा येथील सिध्दार्थ गजानन भोजने यशस्वी



दैनिक वादळ वार्ता


**केज । प्रतिनिधी**

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेच्या एन.एम.एम.एस.परीक्षेत आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बनसारोळा येथील विद्यार्थी चि.सिध्दार्थ गजानन भोजने याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी भर पडली असून परिसरात त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.सिध्दार्थ भोजने याने कठोर परिश्रम व सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर ही शिष्यवृत्ती मिळवली असून पुढील शिक्षणासाठी त्याला याचा मोठा लाभ होणार आहे.या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार आहे.या यशा बद्दल विद्यार्थ्याचे अभिनंदन शाळेचे मुख्याध्यापक बालासाहेब काकडे, संस्थेचे अध्यक्ष अशोकराव काकडे तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी केले आहे.विद्यार्थ्याच्या पुढील वाटचालीसाठी सर्वांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टीत पाइप लाईन दुरुस्ती; काम युद्धपातळीवर, मात्र ग्रामपंचायतीवर प्रश्नचिन्ह

दैनिक वादळ वार्ता

**आष्टी । प्रतिनिधी**



श्रीष्टी येथील तलावातून आष्टी शहराला पाणीपुरवठ करणाऱ्या मुख्य पाइपलाईनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने गेल्या काही दिवसांपासून अनेक भागांतील पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. या पार्श्वभूमीवर आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी ग्रामपंचायतीने तातडीने हालचाली करत दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे.सदर कामाची पाहणी सरपंच मधुकर मोरे, उपसरपंच नसरुल्ला खान काकड, तसेच ग्रामपंचायत सदस्य आसिफ कच्छी, बबलू सातपुते आणि इतर सदस्यांनी केली. संबंधित कर्मचाऱ्यांना काम जलदगतीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, लवकरच नियमित पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येईल, असा विश्वास ग्रामपंचायत प्रशासनाने व्यक्त केला आहे.

दरम्यान, ग्रामविकास अधिकारी डी. बी. काळे यांनी नागरिकांना काही काळ सहकार्य करण्याचे आणि पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहन केले आहे.

**मात्र काही प्रश्न उपस्थित**

मुख्य पाइपलाईनमध्ये बिघाड होण्याची ही पहिलीच वेळ आहे का, की यापूर्वीही अशा समस्या वारंवार घडल्या आहेत?

नियमित देखभाल आणि तपासणी वेळेत का करण्यात आली नाही?

बिघाड झाल्यानंतरच प्रशासनाला जाग का येते, पूर्वनियोजनाचा अभाव का दिसून येतो? पाणीपुरवठ्यासारख्या अत्यावश्यक सेवेसाठी पर्यायी व्यवस्था का करण्यात आली नव्हती?

नागरिकांना त्रास सहन करावा लागल्यानंतरच कामे हाती घेण्याची पद्धत बदलणार का? स्थानिक नागरिकांमध्ये या प्रश्नांची चर्चा सुरू असून, भविष्यात अशा समस्यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ग्रामपंचायतीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# परळीत सोमवारी मांस विक्री बंदीचा ऐतिहासिक निर्णय; सर्वानुमते ठराव मंजूर

दैनिक वादळ वार्ता

**परळी वैजनाथ (वार्ताहर)**



परळी नगरपरिषदेच्या दि. ३० एप्रिल २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत प्रत्येक सोमवारी मांस विक्री बंदी या महत्त्वपूर्ण विषयास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. परळी हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक पवित्र तीर्थक्षेत्र असल्यामुळे नागरिक व भाविकांच्या भावना लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला.

यापूर्वी दि. २० एप्रिल २०२६ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत हा विषय समाविष्ट करण्यात आला होता. त्यानंतर आजच्या सर्वसाधारण सभेत हा विषय मांडून अंतिम मंजुरी देण्यात आली.

परळी नगरपरिषदेच्या थेट लोकनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या नेतृत्वाखाली हा निर्णय घेण्यात आला असून, त्यांच्या विकास पर्व २.० या संकल्पनेतून जनभावना, धार्मिक संवेदनशीलता आणि स्थानिक गरजा यांचा समतोल साधणारे प्रशासन दिसून आले. शहराच्या सर्वांगीण विकासाबरोबरच परळीच्या पवित्रतेचा सन्मान राखण्याचा त्यांचा दृष्टीकोन या निर्णयातून अधोरेखित झाला आहे.

या निर्णयासाठी मा. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे (पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री, महाराष्ट्र राज्य) व मा. आमदार धनंजय मुंडे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच उपनगराध्यक्षा सौ. खैसर राजा खान पठाण, गटनेते तसेच सर्व नगरसेवक-नगरसेविका यांच्या एकमताने हा ठराव मंजूर करण्यात आला.

या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते श्री. शिवकुमार केदारी (हिंद नगर, परळी वैजनाथ) यांनी या निर्णयाचे स्वागत करत सर्व पदाधिकारी व सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानले. तसेच या विषयाला व्यापक प्रसिद्धी देणाऱ्या सर्व पत्रकार, ऑनलाइन न्यूज चॅनल व टीव्ही प्रतिनिधी यांचेही त्यांनी विशेष आभार व्यक्त केले.

# पशुसंवर्धन विभागाच्या वतीने सर्व पशुपालक आणि शेतकरी बांधवांसाठी फसवणूकी पासुन सावध राहण्याचे आव्हान-डॉ.संजय नाकलगावकर

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**



मुख्यमंत्री ग्रामीण उद्योग योजना खाजगी चॅनेलपासून सावध राहा: अनेक खासगी युट्युबर्स, फेसबुक पेजेस किंवा व्हॉट्सप ग्रुप्स या योजनेबद्दल स्वतःच्या फायद्यासाठी चुकीची माहिती किंवा दावे करत आहेत.विभागाचे स्पष्टीकरण: पशुसंवर्धन विभागाने अशा कोणत्याही खाजगी माहितीचे किंवा दाव्यांचे समर्थन केलेले नाही.फसवणूक टाळा: कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करू नका किंवा खाजगी व्यक्तीला योजनेच्या नावाखाली पैसे/कागदपत्रे देऊ नका.

अधिकृत माहिती कोठे मिळेल?

जर तुम्हाला या योजनेचा लाभ घ्यायचा असेल, तर केवळ खालील अधिकृत मार्गांचाच अवलंब करा: पशुवैद्यकीय दवाखाना: तुमच्या गावातील किंवा तालुक्यातील जवळच्या शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्यात जाऊन प्रत्यक्ष माहिती घ्या.टोल-फ्री क्रमांक: कोणत्याही शंकेसाठी १९६२ या अधिकृत क्रमांकावर संपर्क साधा.अधिकृत संकेतस्थळ: पशुसंवर्धन विभागाच्या ahd. maharashtra .gov.in या वेबसाईटला भेट द्या. सोशल मीडिया: विभागाच्या अधिकृत (Verified) फेसबुक आणि इन्स्टाग्राम पेजवरूनच माहिती मिळवा. सावध रहा, सुरक्षित रहा. अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीचाच आधार घ्या.ही माहिती जास्तीत जास्त शेतकरी गटांमध्ये, पशुपालक, शेतमजूर ह्या आपल्या बांधवांना फसवणुकीपासून सावध राहण्याचे आव्हान पशुवैद्यकीय चिकित्सक डॉ. संजय नाकलगावकर यांनी केले आहे.

# ६१ लाख खर्चुनही चारमळीत पाणीबाणी!

दैनिक वादळ वार्ता

**जळगाव । जितु इंगळे**



(वा.) मौजे चारमाळी (ता. यावल) येथे केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी जल जीवन मिशन, हर घर जल योजनेचा प्रत्यक्षात पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे समोर आले आहे. सुमारे ६१ लक्ष दहा हजार २२६ रुपये इतका निधी मंजूर होऊनही गावात आजपर्यंत पाण्याचा एक थेंबही पोहोचलेला नाही, ही अत्यंत संतापजनक बाब आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री तसेच जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री असलेल्या मंत्र्यांच्या जिल्ह्यातच आदिवासी भगिनींना पिण्याच्या पाण्यासाठी जंगलात भटकंती करावी लागत असल्याची वस्तुस्थिती अत्यंत लज्जास्पद असून प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करत असल्याचा आरोप नवसंजवनी जिल्हा समिती सदस्या प्रतिभा शिंदे यांनी केला आहे. या कामाची पाइपलाइन व इतर कामे अपूर्ण व निकृष्ट दर्जाची करण्यात आली

**तत्काळ टँकरची व्यवस्था करण्याची मागणी**

गर्भवती महिलांनाही पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे, ही बाब प्रशासनाच्या संवेदनशून्यतेचे द्योतक आहे. हर घर जल योजना चारमाळीत प्रत्यक्षात हर घर त्रास ठरत असल्याची संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. चारमाळी गावासाठी तात्काळ दररोज पाणी टँकरची व्यवस्था करण्यात यावी जल जीवन मिशन अंतर्गत झालेल्या कामांची उच्चस्तरीय, निष्पक्ष चौकशी असून पाण्याच्या टाकीसाठी केलेली कामे निकृष्ट दर्जाची आहेत. संपूर्ण योजना कागदोपत्री पूर्ण दाखवून प्रत्यक्षात ग्रामस्थांना पाण्यापासून वंचित करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अपूर्ण व निकृष्ट कामे त्वरित पूर्ण करून पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा, या प्रकरणाची पालकमंत्र्यांनी स्वतः दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारावा, अशी ठाम मागणी करण्यात येत आहे. ७ दिवसांच्या आत ठोस कार्यवाही न झाल्यास ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलनाचा, असा इशारा चारमाळी येथील ग्रामस्थांनी दिला आहे.ठेवले आहे. यामुळे चारमाळी गावातील महिला, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना दररोज सुमारे दीड किमी अंतरावरून पाणी आणावे लागत आहे. या कडे अधिकाऱ्यांनी पण लक्ष घालावे अशी मागणी जोर धरत आहे..

# गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावरील दाखल झालेला खोटा गुन्हा न्यायालयाने अखेर रद्द

## तक्रार दाराविरुध्द अब्रु नुकसानीचा दावा दाखल

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

गेली २२ वर्षे शिक्षण क्षेत्रात सेवा बजावत असताना दि. ०१/१२/२०२३ पासून केज तालुक्यात गट शिक्षणाधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत होते या कार्यकाळात २४५ जि.प. व एकूण २६८ शाळांचे कामकाज सुरळीत व पारदर्शक पद्धतीने सुरू होते . तालुक्यातील जनतेने माझ्या कामाची अनेकदा प्रशंसा केली आहे. मला बदनाम करण्याच्या हेतुने श्रीमती लता उमेश शिंदे व पल्लवी उमेश शिंदे, रा. समर्थ नगर, केज यांनी दि. १९/०१/२०२५ रोजी केज पोलीस स्टेशन येथे कलम ७४, ७५(१), ७५(२), ३५४(२), ८, १२ अंतर्गत माझ्या विरुध्द खोटी व बदनामी कारक फिर्याद दाखल केली होती. सदर फिर्याद ही पूर्वनियोजित कट होता माझी सामाजिक व शैक्षणिक प्रतिमा मलीन करण्याच्या उद्देशाने जाणीव पूर्वक करण्यात आली आहे. एक जबाबदार अधिकारी म्हणून मी कायद्याचा व महिलांच्या सन्मान कायम आदर केला आहे. माझ्यावर लावलेले सर्व आरोप बिनबुडाचे, तथ्यहीन व सूडबुद्धीने केलेले आहेत.

या बाबद औरंगाबाद खंडपीठाने दिनांक ५/ ३ /२०२६ रोजी च्या निकालात सदरील गुन्हा रद्द केला आहेया खोट्या गुन्ह्यामुळे माझी व माझ्या कुटुंबाची नाहक बदनामी झाली असून, मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे माझे वकील ॲड. बी. एल. यादव यांच्यामार्फत दि. २७/०४/२०२६ रोजी संबंधितांवर ५० लाख रुपयांची अब्रु नुकसानीची व ५,००० रुपये नोटीस खर्चाची कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे.

मी माध्यमांना विनंती करतो की, वस्तुस्थितीची शहानिशा न करता कोणते ही एकतर्फी वृत्त प्रसिद्ध करू नये, मी कायद्यावर व न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास ठेवून कायदेशीर लढाई लढणार आहे.

आसे माजी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांनी व्यक्त केले.

# स्वामी विवेकानंद शाळे मध्ये महाराष्ट्र दिना निमित्त विविध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न

## याप्रसंगी एनएमएमएस शिष्यवृत्तीधारक ८ विद्यार्थ्यांचा तसेच इतर गुणवंतांचा सत्कार करण्यात आला

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित स्वामी विवेकानंद विद्या मंदिर माध्यमिकविभाग या शाळेमध्ये दि.१ मे रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून विविध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ कार्यक्रम संपन्न झाला.याप्रसंगी जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, शाळेचे माजी मु.अ. बाळासाहेब तिडके, सेवानिवृत्त सहशिक्षक हनुमंत घाडगे,प्राचार्य शंकर भैरट,शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभीस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी शाळेचे सेवानिवृत्त सहशिक्षक हनुमंत घाडगे यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले.कार्यक्रमाच्या पुढील सत्रात शाळेतील विविध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ८ वी एन.एम. एम.एस.शिष्यवृत्तीधारक, विज्ञान प्रदर्शन स्पर्धेतील गुणवंत,शालेय मंत्रिमंडळातील



उत्कृष्ट कार्य करणारे गुणवंत, तसेच इयत्ता ५ वी ते ११ वी वर्गातील गुणानुक्रमे आलेल्या विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या एन.एम.एम.एस.या परीक्षेची निवड यादी दि. २४ फेब्रुवारी २०२६रोजी प्रसिद्ध झालेली आहे.या निवड यादीमध्ये शाळेतील एकूण आठ विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये आलेले आहेत. यामध्ये- आर्यन अंगद मुंडे,यशश्री सतीश नेहरकर,ओमकार सूर्यकांत चाटे,सुधांशू अंगद भराडे,तुषार विलास पोवळे,तनुजा संतोषकुमार बियाणी, हरिओम गणेश गिरी, आर्या अमरदीप गायकवाड इत्यादी.

तसेच विज्ञान प्रदर्शन स्पर्धेमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्कृष्ट व विलोभनीय असे प्रयोग सादर केले. यामध्ये विद्यार्थ्यांनी लेझर तंत्रज्ञानाद्वारे पाण्यातील जिवाणू ओळखणे,भूअंतर्गत भूकंपाच्या हालचाली, स्वामी विवेकानंद स्मार्ट स्कूल,व इतर असे उल्लेखनीय प्रयोग सादर केले.राष्ट्रीय विज्ञान दिना निमित्त विज्ञान प्रदर्शना मध्ये लहान गटातून स्वरा राऊत हिने प्रथम पारितोषिक पटकावले. सोहम कापरे,सार्थक चाळक यांनी द्वितीय तर अनुज चाळक व विराज शिंदे यांनी तृतीय पारितोषिक मिळविले. तर मोठ्या गटातून अजय आदमाने व अथर्व नेहरकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला.तर हर्षदा शिरसट हिने द्वितीय पारितोषिक पटकाविले.सुदर्शन शिंदे, यशवंत पाळवदे यांनी तृतीय तर शौर्य बारगजे व वेदांत राऊत यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

शाळेच्या मंत्रिमंडळातील उत्कृष्ट मुख्यमंत्री पुरस्कार तसेच स्कॉलर स्टुडन्ट ऑफ द इयर हा पुरस्कार इयत्ता सातवी तील विद्यार्थीनी आर्या राजेंद्र लटपटे हिला मिळाला.उपमुख्यमंत्री- शौर्य भगवान बारगजे, शिक्षणमंत्री- गुंजन धनंजय घोळवे,अपूर्वा उत्तरेश्वर सोनवणे, नियोजनमंत्री-श्रावणी संतोष लोंढे,आरोग्यमंत्री- श्रेया उत्तरेश्वर धपाटे, वित्तमंत्री- किशोरी संदीप मुळे,गृहमंत्री- समृद्धी बालाजी नेहरकर, पर्यावरणमंत्री- सृष्टी गोरोबा अडसूळ, सांस्कृतिकमंत्री- संस्कृती सुजीत गायकवाड, प्रांजल चेतन जावळे, प्रसिद्धीमंत्री- तेजस्विनी भास्कर कापरे सदरील विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक प्रबोधकांत समुद्रे यांचे मार्गदर्शन लाभले.वरील सर्व विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले तर आभार शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे यांनी मानले.

# श्याम ज्युनियर कॉलेज दहिफळ वडमाऊलीची यशाची परंपरा कायम

## १२ वी विज्ञान व कला शाखेचा निकाल १०० टक्के

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली येथील नामांकित श्याम ज्युनियर कॉलेजने यंदाही बारावी (१२ वी) विज्ञान व कला शाखेचा निकाल १०० टक्के लावून आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देत सातत्याने उत्कृष्ट निकाल देणाऱ्या या महाविद्यालयाने पुन्हा एकदा आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली आहे.

यंदाच्या निकालात विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी विशेष उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाचा लौकिक उंचावला आहे. विज्ञान शाखेत ठोंबरे अथर्व यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर निकिता वनवे यांनी द्वितीय क्रमांक मिळवला आणि नानजकर यांनी तृतीय क्रमांक मिळवत यश संपादन केले. या विद्यार्थ्यांच्या







यशामुळे महाविद्यालयाचा अभिमान वाढला आहे.

एकूण निकालात विशेष श्रेणीत तब्बल ८५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, प्रथम श्रेणीत १६१ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणीत २८ विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. कला शाखेतील सर्व विद्यार्थ्यांनीही उत्तीर्ण होत १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.

या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचे सहकार्य, तसेच प्राध्यापकांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन आणि महाविद्यालयाच्या शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरणाचा मोठा वाटा असल्याचे प्राचार्या श्री. जयश्री ईप्पर मॅडम यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देत आधुनिक पद्धतीने अध्यापन केले जात असल्यामुळेच हे यश शक्य झाले असल्याचे त्यांनी नमूद केले.

या यशाबद्दल संस्थेचे सचिव इंजि. शरद (बप्पा) गदळे, डॉ. शशिकांत दहिफळकर (गदळे), संस्थेच्या कोषाध्यक्ष सौ. शालिनीताई कराड (गदळे), उपप्राचार्य श्री. गंदगे राजकुमार सर, प्रा. धनराज भालेवर तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार असून, पुढील उच्च शिक्षणासाठी त्यांना मार्गदर्शनही केले जाणार आहे. महाविद्यालयाच्या या सातत्यपूर्ण यशामुळे दहिफळ वडमाऊलीसह संपूर्ण केज तालुक्यात शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, श्याम ज्युनियर कॉलेज हे गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे केंद्र म्हणून अधिक दृढपणे पुढे येत आहे.

# आदर्श विद्यालय बनसारोळा शाळेचे बारावी निकालात यश ; गुणवंत विद्यार्थ्यांची उज्ज्वल कामगिरी




दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

बनसारोळा ता.केज,जि. बीड येथील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने इ.१२ वी २०२६ च्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत एकूण ९६.१७% शाळेचा निकाल नोंदवला आहे. विद्यालयाच्या या यशा मुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे.विज्ञान शाखेचा ९९.६८% निकाल लागला असून

प्रथम क्रमांक - उदय गोविंद वाघमारे ८६.८३,
द्वितीय क्रमांक -श्रेय आंगणराव बोंडे व कांचन कल्याण काळे ८३.००%,
तृतीय क्रमांक - इंद्राणी निलेश कदम ८२.८३ % यांनी मिळवला.वाणिज्य शाखेत ९८.२७%निकाल लागला असून प्रथम क्रमांक - वैष्णवी नामदेव गीते ७६.५०%,द्वितीय क्रमांक- अजित बालासाहेब राठोड ७२.०० %,तृतीय क्रमांक - शुभम राजेंद्र पोते ७१.३३% यांनी मिळवला

कला शाखेचा ८२.२२% निकाल लागला असून प्रथम क्रमांक- सोनाली दशरथ शिंदे ८०.८३%, द्वितीय क्रमांक -जागृती गणेश कुलकर्णी ७०.५० %,तृतीय क्रमांक -राहुल सुनील देशमुख ६८.६७% यांनी मिळवला.या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले.या यशा बद्दल संस्थेचे अध्यक्ष अशोकराव काकडे, मुख्याध्यापकबालासाहेब काकडे तसेच शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यालयाच्या सातत्यपूर्ण गुणवत्तेमुळे उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राहिल्याचे सांगण्यात आले.

# नायगावच्या भूमिपुत्राची पोलिस दलात दमदार एन्ट्री ; जिद्द-मेहनतीचा विजय



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील नायगावचे भूमिपुत्र प्रशांत प्रभाकर कुलकर्णी याने महाराष्ट्र शासनाच्या पोलिस भरती प्रक्रियेत उल्लेखनीय यश मिळवत पोलिस दलात आपल्या जिद्दीच्या बळावर दमदार एन्ट्री केली आहे.त्यांची नियुक्ती जिल्हा पोलिस म्हणून मुंबईतील मीरा-भाईंदर येथे झाली असून,या यशामुळे संपूर्ण गावात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सामान्य कुटुंबातून येत प्रशांतने मोठी स्वप्ने पाहिली आणि ती पूर्ण करण्यासाठी अविरत परिश्रम घेतले.स्पर्धेच्या कठीण टप्प्यांतून मार्ग काढताना त्याने जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाने अनेक अडचणींना न जुमानता त्यांनी सातत्याने अभ्यास व शारीरिक तयारी करत हे यश आपल्या नावावर केले.प्रशांतच्या निवडीने नायगावच्या शिरपेचात मानाचा तुरा खोचला असून,केज तालुक्याचे नावही उज्ज्वल केले आहे.त्याच्या प्रेरणादायी प्रवासामुळे अनेक युवकांना नवीन दिशा आणि उमेद मिळणार आहे.प्रशांतच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे.

# बीडमधील कृषी प्रदर्शन भरकटले; शेतीची अवजारे सोडून 'इग्वाना' बनला मुख्य आकर्षण !

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळावी यासाठी भरवण्यात येणाऱ्या कृषी प्रदर्शनांचा मूळ उद्देश बाजूला पडून ती आता 'करमणुकीची जत्रा' बनत चालली आहेत.

बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणावर सुरू असलेल्या जिल्हास्तरीय कृषी प्रदर्शनात शेतीशी काडीचाही संबंध नसलेल्या विदेशी 'इग्वाना' सरड्यांचा स्टॉल लावण्यात आल्याने शेतकऱ्यांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

१ मे ते ५ मे दरम्यान भरविण्यात येणाऱ्या कृषी प्रदर्शनाचे मोठ्या थाटामाटात राजकीय पुढाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा पार पडला. महाराष्ट्र शासन कृषी विभाग आणि कृषी विकास प्रतिष्ठान गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कृषी प्रदर्शनाचे सुरूवातीपासूनच मोठ-मोठ्या जाहिरातीद्वारे मुख्य आकर्षण म्हणून दक्षिण अमेरिकेतील साडे ५ फुटी इग्वानाजातीच्या सरड्याची दर्शनी भागात मोठमोठे होर्डिंग्ज लाऊन जाहिरातबाजी करण्यात आली.



मुळात कृषी प्रदर्शन हे शेती मातीशी संबंधित घटकाची माहिती शेतकऱ्याला व्हावी आणि त्यापासून शेतकऱ्यांनी काहीतरी बोध आणि शिकवण मिळावी यासाठीच कृषी प्रदूषणाची भरवल्या जातात. परंतु सरडा हा कोणत्या शेतकऱ्याच्या कामाला येतो? किंवा ते कोणत्या कामाचे शेत आवजार आहे? हे न उलगडणारे कोडे आहे. शेती पिकातील नवनवीन वाण तसेच नवीन शेती अवजारांच्या याविषयी नवीन नवीन माहिती मिळवण्यासाठी कृषी प्रदर्शनात याची माहिती शेतकऱ्यांना दिली जाते आणि शेतकरी ही त्यासाठीच येतात. परंतु परदेशातील 'सरड्या' आणि तोही कृषी प्रदर्शानात मुख्य आकर्षण म्हणून असावा यासारखी शेतकर्यांची क्रूरचेष्टा कोणती असू शकते.

# गेवराई मतदारसंघात सामाजिक उपक्रमांनी माजीमंत्री बदामराव पंडितांचा वाढदिवस साजरा



दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघातील भाजप नेत, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांना दैवत मानणाऱ्या गेवराई तालुक्यातील कार्यकर्ते व नागरिकांकडून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. गेवराई मतदार संघातील भाजप कार्यकर्त्यांनी गेवराई, माजलगाव आणि बीड तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम राबविले.

भाजपा नेते, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या निवासस्थानी सौ गिरीकाभाभी पंडित, सौ अनुरूपाताई युधाजित पंडित यांनी औक्षण केले. याप्रसंगी जि.प. चे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवानेते रोहित पंडित, युवानेते यशराज पंडित, राजवीर पंडित, नयनतारा पंडित यांची उपस्थिती होती. बदामराव पंडित यांना शुभेच्छा देण्यासाठी सकाळपासूनच शहरासह ग्रामीण भागातील विविध क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांसह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी त्यांच्या निवासस्थानी गर्दी केली होती. बदामराव पंडित यांना दिवसानिमित्त पुस्तके त्यासोबतच वृक्ष, शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन आलेल्या चाहत्यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी आलेल्या प्रत्येकाशी अस्थेवाईकपणे चर्चा केली. तालुक्यातल्या प्रत्येक गावात असलेल्या अडीअडचणी याचीही माहिती उपस्थितांकडून घेतली.

दिवसभर व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व भाजप कार्यकर्त्यांची बदामराव पंडित यांच्या बंगल्यावर त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077